पुढारी



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेत सुवर्ण व कांस्यपदकांची कमाई करणारे कोल्हापूर जिल्हा रग्बी असोसिएशनचे मुले-मुली. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेत कोल्हापूरच्या खेळाडूंचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लखनौ (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खेलो इंडिया रग्बी स्पर्धेत कोल्हापूर जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनच्या मुलांनी भरघोस यश मिळविले. भारती विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक प्राप्त केले. तर मुलींनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाचे प्रतिनिधित्व करत कांस्य पदकाची कमाई केली.

मुलांच्या संघात पृथ्वीराज पाटील, श्रीधर निगडे, तेजस पाटील, ओंकार चौगले, संकेत पाटील, तेजस पाटील, विनायक पोवार यांचा तर मुलींच्या संघात शुभांगी गावडे, कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, साक्षी कुंभार, सायली पाटील, स्वाती माळी यांचा समावेश आहे. सर्वांना संघटनेचे चिफ पेट्रन मालोजीराजे, सौ. मधुरिमाराजे, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, अध्यक्ष अमर सासने, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, प्रा. राहुल लहाने, प्रशिक्षक दीपक पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

2 5 JUN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कौशल्य विकास असणाऱ्यांनाच रोजगार'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जागतिकीकरणाच्या खुल्या आर्थिक धोरणामुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या, या कंपन्यांमध्ये स्पर्धा वाढू लागली, यातूनच तरुणांसाठी आजची बाजारपेठ ही रोजगाराची संधी आहे. त्यात कौशल्य विकास असणाऱ्यांनाच रोजगाराच्या अधिक संधी आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. प्रा. आर.डी. पडवळ यांनी केले.



आर. डी. पडवळ

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण सांगली विभागीय केंद्र, सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, मिरज कन्या महाविद्यालय, सांगलीचे राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकास' या विषयावर विशेष ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी.के. मोरे होते.

डॉ. पडवळ म्हणाले, प्रशासकीय, सेवा, कला, शिक्षण, दळणवळण, पर्यटन, माहिती- तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी आहेत. त्यासाठी आत्मविश्वास, कौशल्य, कष्ट करण्याची तयारी महत्त्वाची आहे.

प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. उल्हास माळकर, प्राचार्य डॉ. मानसी गानू, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, डॉ. के. बी. पाटील, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते. प्रा. व्ही. बी. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुशांत माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. एम. आर. चादरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जी. बी. चव्हाण यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठाची स्वच्छ वारी, निर्मल वारी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वच्छ वारी, निर्मल वारी, स्वस्थ वारी, हरित, प्लास्टिकमुक्त वारी उपक्रम राबवित लोणंद ते फलटण या वारी मार्गावर स्वच्छता केली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी लोणंद येथे माऊलींच्या पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले. लोणंदच्या नीरा घाटावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छ व हरित वारी अभियानाचे उद्घाटन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. डी.के. मोरे, डॉ. तानाजी चौगले, डॉ. डी. बी. जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. कुंभार, डॉ. एन.बी. माने उपस्थित होते. सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे १५० विद्यार्थी सहभागी झाले.

पुढारी

# विद्यापीठाकडून पदवीच्या ८९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेअंतर्गत आजअखेर ८९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. शनिवारी बीसीएस, पीजी डिप्लोमा जिओ इन्फॉर्मेटिक्स, बीएस्सी, पीजी डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ व्होकेशन, मास्टर ऑफ आर्टस् इन वुमेन स्टडीज, मास्टर ऑफ सायन्स आदी ३० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयात झाल्या. यावेळी ४ हजार ३०७ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून ९ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद केली आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ 'एनएसएस' विभागाची वारी मार्गावर स्वच्छता

कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी यंदाही आषाढी वारीमध्ये 'स्वच्छ वारी, निर्मल वारी, स्वस्थ वारी, हरित वारी, प्लास्टीकमुक्त वारी' अशी विविध अभियानांसह उपक्रम राबविले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी लोणंद येथे माऊलींच्या पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले. लोणंदच्या नीरा घाटावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छ व हरित वारी अभियानाचे उद्घाटन केले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. डी. के. मोरे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले, प्राचार्य डॉ. डी. बी. जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी संचालक डॉ. एन. बी. माने उपस्थित होते.

मुधोजी महाविद्यालयात वारी शिबिराचा समारोप समारंभ झाला.

तरुण भारत

# विद्यापीठ ८९ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मार्च–एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांपैकी ८९ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. तर शनिवारी झालेल्या परीक्षांना ४ हजार ३०७ विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ आर्ट, बॅचलर ऑफ जर्नालिझम, बॅचलर ऑफ व्होकेशन, मास्टर ऑफ आटर्स, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर आटर्स इन वुमेन स्टडीज, मास्टर ऑफ आटर्स (होम सायन्स) आदी विषयांचा समावेश आहे. भरारी पथकाकडून सांगलीतील चार आणि साताऱ्यातील पाच एकूण नऊ गैरप्रकाराची नोंद झाली आहे.